वैद्यांना एम.डी. पदवीधारकांना वेळोवेळी ज्या दराने प्रतिपूर्ती केली जाते त्याच दराने त्यांच्या सल्ला फी ची व त्यानंतरच्या पुनर्सल्ला फीची प्रतिपूर्ती करता येईल.

दातांच्या उपचारांच्या बाबतीत केवळ बी.डी.एस. ही शैक्षणिक अर्हता सल्ला देण्यासाठी [कन्सलटंट] पुरेशी नाही. जे एम.डी.एस. किंवा एल.डी.एस. आर.सी.एस./एफ.डी. एस.आर.सी.एस.ही अर्हता धारण करतात त्यांना अर्हताप्राप्त सल्लागार म्हणून समजण्यात यावे.

२] खाजगी वैद्यक व्यवसायी यांच्या उपचाराबाबत भेट फी संबंधी असे स्पष्ट करण्यात येते की, सामान्यत: एकूण चार पर्यंत, इतक्या भेटी खाजगी डॉक्टरांच्या बाबतीत भेट फी देण्याकरिता विचारात घेण्यात हरकत नाही. तथापि अशा बाबतीत परिस्थितीवर व आजाराच्या स्वरुपावर अवलंबून प्रत्येक प्रकरणी गुणावगुणानुसार मानसेवी वैद्यकीय अधिका-यांनी विचार करणे योग्य होईल. परंतु याउपरही काही अभिप्राय आवश्यक वाटल्यास त्याबाबत या कार्यालयाकडे विचारणा करावी.

३] विकृती चिकित्सकांच्या बाबत अर्हता प्राप्त प्रयोग शाळा तंत्रज्ञ असल्यास आणि त्याची स्वत:ची प्रयोगशाळा असल्यास तेथे केलेल्या चाचण्यांच्या खर्चास आपल्या विहित दराप्रमाणे मंजुरी देण्यास हरकत नाही. तथापि एखादी खाजगी संस्था असेल किंवा विश्वस्त रुग्णालय असेल तर अशा तपासण्यांची जबाबदारी त्या ठिकाणी असणा-या सल्लागार विकृती चिकित्सकावर राहील, आणि त्यामुळे संबंधित पावत्यांवर त्याची सही असणे आवश्यक राहील.

४] किरणोपयोजन [रेडीओ-लॉजिकल] चाचण्यांच्या बाबतीत रेडीओग्राफरला एक्सरे क्लिनिक चालविण्याची मुभा नसते आणि म्हणून त्याने दिलेला अभिप्राय किरणोपयोजन [रेडीओलॉजिकल] चाचण्यां-बाबत प्रतिपूर्तीच्या प्रयोजनार्थ ग्राह्य धरणे योग्य होणार नाही. ज्या शल्य चिकित्सकाकडे क्ष किरण यंत्र असते त्यांच्या-कडे केलेल्या क्ष किरण चाचण्यांचीसुध्दा प्रतिपूर्ती होत नाही. कारण अशी चाचणी अथवा अभिप्राय तज्ञ रेडीओलॉजिस्टचा असत नाही. हे लक्षात घेता रेडीओ-लॉजिस्ट म्हणून नोंदणी केलेल्या रेडीओलॉजिस्टकडूनच अशा चाचण्या केलेल्या असणे प्रतिपूर्तीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

५] एखादया रुग्णालयामध्ये औषधी दुकान असल्यास तेथे खरेदी केलेल्या औषधा-करिता रोख पावती [कॅश मेमो] दिली जात असेल तर ती इतर कोणत्याही औषधी दुकानाप्रमाणेच त्या खर्चाची प्रतिपूर्ती होण्यासाठी ग्राह्य आहे.

६] प्रत्येक कर्मचा-यांच्या वैयक्तिक अडचणी सोडवणे अशक्य असले तरी आणि प्रत्येक दूरच्या ठिकाणी अर्हता प्राप्त डॉक्टर उपलब्ध असणे अवघड असते. तरी प्रत्येक देयका बाबत त्याच्या गुणावगुणानुसार वैद्यकीय अधिका-यांनी विचार करणे योग्य होईल.

७] सामान्यत: लेखा खात्याने किंवा सक्षम मंजुरी प्राधिका-यांनी मानसेवी वैद्यकीय अधिका-यांच्या अभिप्रायापेक्षा किंवा शिफारशीपेक्षा वेगळी कार्यवाही केली तर ती त्याची जबाबदारी असते. तथापि याबाबतसुध्दा मतभेदाच्या प्रकरणी कार्यालयाने अथवा मानसेवी वैद्यकीय अधिका-याने या कार्यालयाकडे संदर्भ करणे योग्य होईल असे सुचविण्यात येते.

८] काही वेळेला मानसेवी वैद्यकीय अधिकारी त्यांच्या स्वत:च्या दवाखान्यात/रुग्णालयात उपचार देतात, हे शक्य आहे. अशा प्रकरणी लेखा खात्याने प्रतिपूर्ती बाबत नकार दर्शविला तरी त्यांच्या ग्राह्यतेबद्दल या कार्यालयाकडे संदर्भ केल्यास संभाव्य संघर्ष टाळता येईल.

.. ३ ..